# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/12/2022 (शनिवार) सायंकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कुही :– दिनांक २४/१२/२०२२ रोजी कुही पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा खापरी फाटा नागपूर उमरेड रोड या मार्गावर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड रोड क्र ३५३ डी रोडवर मौजा खापरी फाटा येथे पोलीस स्टेशन कुही येथील पोलीस पथक हे ऑल आऊट व कोंबींग ऑपरेशन नाकाबंदी करीत असताना वेळ ०२.०० वा. सुमारास उमरेड कडून नागपूरच्या दिशेने एक विटकरी रंगाचे आयसर ट्रक दिसून आले. पोलीसांनी वाहन थांबवण्याचा इशारा केला परंतू सदर वाहन चालकाने त्यांचे ताब्यातील वाहन न थांबवता काही अंतरावर जावून रोडच्या खाली स्लोप मध्ये उतरवून ईलेक्ट्रीक पोलला धडकले. वाहना जवळ जावून पाहणी केली असता आयसर गाडीचा क्र. एम.एच ४० बी.एल ३५४२ चा चालक आरोपी नामे– १) मोहमंद रिजवान मोहमंद रफीक शेख, वय २९ वर्ष, रा. प्लॉट नं. ९५ रफु सुलतान चौक शिवशक्ती नगर ,कंट्रोल उपलवाडी नागपूर वाहन चालकाला वाहनामध्ये कोणता मुद्देमाल आहे असे विचारले असता त्यांनी उडवा उडविची उत्तरे दिली. तेव्हा पोलीस स्टाफसह वाहना जवळ जावून पाहणी केली असता आयसर कंपनीचा ट्रक डाल्यामध्ये एकुण गोवंशी जनावरे निर्दयतेने डांबून बांधून त्यांना चारापाणी न देता कोंबून दाटीवाटीने अपुऱ्या जागेत जनावरांना त्रास होईल अशा स्थितीत कत्तलीसाठी नेण्या करीता वाहतूक करीत असताना मिळून आले. सदर जनावरांची बाजार किमंती १०,०००/–रू. प्रमाणे २७ जनावरे एकुण किमंती २,७०,०००/– रूपये असा तसेच आयसर गाडी किमंती ७,००,०००/–रू असा एकुण वाहनासह ९,७०,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सरतर्फे स.फौ. विजय कुमरे ब.नं. १४५३ पो.स्टे. कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे वरील आरोपीविरुध्द कलम 279, 427 भा.द.वी. सह कलम ११(१), ११(१) (डी), ११(१) (जी) प्रा. छ. प्र. अधि.१९६० सह कलम ५ए(१) म. पशु. अधि. १९७६ सह कलम १८४, १३०, १७७, ९ मो.वा.का. काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनकुसरे पो.स्टे. कुही मो.नं. ९०२१५४२९१८ करीत आहे.

# घरफोडी

''''

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत विवेकानंद नगर कन्हान येथे दिनांक २२/१२/२०२२ चे १७.३० वा. ते दि. २३/१२/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे— मुकेश जयवंतराव रेडडी, वय ७० वर्ष, रा. हनुमान मंदीरच्या जवळ विवेकानंद नगर कन्हान यांच्या घराची खिडकी तोडुन आत प्रवेश करून १) पाण्याचा पंप अर्धा हॉर्स पॉवरचा किंमती अंदाजे १०००/— रू. २) कटर मशीन किंमती अंदाजे १०००/—रू. ३) मिक्सर किंमती अंदाजे ५००/—रू. ४) बीडा की डाई मशीन किंमती अंदाजे ५०००/— रू. ५) २ घमेले २ फावडे १ सब्बल, १ ढुम्मस व लोहयाचा हातोडा किंमती अंदाजे १०००/— रू. ६) व इतर लोहयाचे सामान किंमती अंदाजे २०००/—रू. असा एकुण १०५०० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन कन्हान करीत आहे.

''''

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०.५ किमी अंतरावर लघु पशूवैदयकीय दवाखाना येथे दिनांक ०९/१२/२०२२ चे १८.०० वा. ते दि. १०/१२/२०२२ चे ०८.३० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने स्वत:चे आर्थिक फायदयासाठी फिर्यादी नामे— अतुल भाऊराव चटप, वय ४१ वर्ष, रा. उमरी नांदा, ता. सावनेर हे काम करत असलेल्या लघु पशु वैदयकीय चिकीत्सालय दवाखाना सावनेर येथील मुख्य दरवाज्याचे कुलूप तसेच दवाखान्यातील आतमधील कार्यालयाचे कॅबीनचे कुलूप तोडुन आत मध्ये प्रवेशे करून शासकीय सेवा शुल्काचे डब्यातील १२०/— रू नगदी व अनिल दिवाने यांच्या खाजगी बॅग मधील ३५०/— रू. असा एकुण ४७०/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नायक हावरे, ब. नं. १५४६ मो. नं. ९८२३९३०७१२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**